रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ९३
www.ramprahar.com
◆ मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

हरिहरेश्वरमध्ये मध्यरात्री आढळली महाकाय मगर/२
दसरा : धार्मिक महत्त्व, परंपरा आणि संदेश/४
रिद्धिमा म्हात्रेचा बॅडमिंटन स्पर्धेत ‘सुवर्ण स्मॅश’/८

## प्रज्ञान ओझा बीसीसीआयचे नवे निवड समिती अध्यक्ष



**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) निवड समितीमध्ये मोठे बदल केले आहेत. माजी डावखुरा फिरकीपटू प्रज्ञान ओझा याच्याकडे भारतीय पुरुष क्रिकेट संघाच्या निवड समितीच्या अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. त्याने अजित आगरकर यांची जागा घेतली आहे. दुसरीकडे महाराष्ट्राचे माजी क्रिकेटपटू आणि अनुभवी प्रशिक्षक रमेश पोवार यांचीही निवड समितीत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अशोक मल्होत्रा आणि जतिन परांजपे यांचा समावेश असलेल्या क्रिकेट सल्लागार समितीने मुंबईतील बीसीसीआय मुख्यालयात अर्जदारांच्या मुलाखती घेतल्यानंतर एकमताने या नावांची शिफारस केली. सर्वात जास्त कसोटी सामने खेळण्याच्या अनुभवाच्या निकषावर प्रज्ञान ओझा यांची अध्यक्षपदासाठी निवड करण्यात आल्याचे बीसीसीआयने स्पष्ट केले.

# रायगडचा वार्षिक आराखडा मंजूर

## विविध विभागांसाठी ५९४ कोटी ६६ लाखांची तरतूद

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचा २०२६-२७ या वर्षाचा ५९४ कोटी ६६ लाख रुपयांचा वार्षिक आराखडा मंजूर करण्यात आला आहे. यात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेसाठी ५१७ कोटी, अनुसूचित जाती उपाययोजनेसाठी २८ कोटी, आदिवासी उपाययोजनेसाठी ४९ कोटी ६६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा नियोजन समितीची सभा सोमवारी (दि. १९) पालकमंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन सभागृहात झाली. महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, खासदार सुनील तटकरे, श्रीरंग बारणे, आमदार रविशेठ पाटील, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी किशन जावळे, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आंचल दलाल आदी या सभेला उपस्थित होते.

वार्षिक आराखड्यातील ५९४ कोटी ६६ लाख रुपयांचा निधी शंभर टक्के खर्च



करण्याचे नियोजन करण्यात यावे, असे आदेश पालकमंत्री भरत गोगावले यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

सर्वसाधारण विभागात महिला व बालकल्याणासाठी २६ कोटी ५० लाख रुपये, शिक्षणासाठी ३३ कोटी, पोलीस व तुरुंगासाठी १३ कोटी तीन लाख ५० हजार रुपये, गतिशील प्रशासन तथा आप्तकालीन व्यवस्थेचे बळकटीकरण यासाठी १० कोटी रुपये, नाविन्यपूर्ण योजनेसाठी १६ कोटी, शाश्वत विकास ध्येयासाठी चार कोटी ५७ लाख ३७ हजार एवढा निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

कृषी व संलग्न सेवेसाठी ५९ कोटी ७९ लाख ९१ हजार, ग्रामविकासाकरिता ३२ कोटी ८० लाख, पाटबंधारे व पूर नियंत्रणाकरिता ३३ कोटी ३० लाख ३१ हजार, ऊर्जा १८ कोटी, उद्योग व खाण २५ लाख ४२ हजार, परिवहन ७९ कोटी ५४ लाख ४६ हजार, सामान्य आर्थिक सेवा १९ कोटी, सामाजिक सेवा २०६ कोटी ३९ लाख ५४ हजार, सामान्य सेवा ६४ कोटी ४० लाख ३४ हजार अशी तरतूद करण्यात आली आहे.

आदिवासी उपाययोजनेत कृषी वने, फलोत्पादन यासाठी चार कोटी १३ लाख, जलसंधारण दोन कोटी १० लाख, उद्योग व उर्जा ४५ लाख, रस्ते व पूल विकास १० कोटी ८८ लाख २५ हजार, शालेय शिक्षण सहा कोटी १२ लाख, आरोग्य १२ कोटी ११ लाख ९१ हजार, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता तीन कोटी ६५ लाख ९९ हजार, मागासवर्गीय कल्याण पाच कोटी ५७ लाख ५९ हजार, महिला व बालविकास तीन कोटी ५४ लाख, नाविन्यपूर्ण योजना ८६ लाख ६० हजार अशी तरतूद करण्यात आली आहे. **(पान २ वर..)**

### पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश

राज्यात निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळी परिस्थितीची दखल घेत महाराष्ट्र सरकारने सुमारे ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित केला असून जिल्हा स्तरावरील संबंधित यंत्रणांमार्फत विविध शासकीय योजनांतर्गत टंचाईवर मात करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवल्या जात आहेत. रायगड जिल्ह्यातदेखील पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार नाही यासाठी उपाययोजना करण्याचे आदेश पालकमंत्री भरत गोगावले यांनी दिले.

अभिनेता टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरण

## तीन आरोपींना राजस्थानमधून अटक

**कोटा : वृत्तसंस्था**

बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या गोळीबार प्रकरणातील तिन्ही आरोपींना राजस्थान पोलिसांनी अटक केली आहे. मुंबईतून सूरत आणि तेथून ते दिल्लीमार्गे नेपाळला जाण्याच्या तयारीत असतानाच मुंबई पोलिसांच्या वेगवान हालचालींमुळे आणि राजस्थान पोलिसांच्या सहकार्याने या तिघांना कोटा येथे अटक करण्यात आली.

राजस्थान दहशतवादाविरोधी पथक आणि कोटा पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत पुणे-जयपूर एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या तिघांना ताब्यात घेतले. मुंबई पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी लागलीच राजस्थान पोलिसांशी संपर्क साधल्याने या तिघांना अटक करण्यात यश आले आहे.

याबाबत पोलीस अधिक्षक तेजस्विनी गौतम यांनी सांगितले की, टायगर श्रॉफ प्रकरणातील आरोपी पुणे-जयपूर रेल्वेने प्रवास करत असून ते सोमवारी कोटा येथे येणार असल्याची माहिती आम्हाला प्राप्त झाली. त्यानुसार आम्ही पथके तैनात करून अवघ्या १५ मिनिटांत सापळा रचून संपूर्ण ट्रेनमध्ये शोधमोहीम राबवली. वेगवान कारवाईमुळे तिन्ही आरोपींना पकडण्यात यश आले असून या आरोपींना आम्ही लवकरच मुंबई पोलिसांच्या ताब्यात देणार आहोत.

आरोपींकडे कोणत्याही प्रकारची शस्त्रे सापडली नाहीत. त्यांनी त्यांच्याकडील शस्त्रांचे काय केले? याची तपासणी केली जाणार आहे, अशीही माहिती पोलिसांनी दिली.

यावेळी पोलिसांनी या तिन्ही आरोपींची नावेही जाहीर केली. यापैकी एक आरोपी अल्पवयीन आहे. दुसऱ्या आरोपीचे नाव ऋतिक कुमार उर्फ रोशन असून तो २२ वर्षांचा आहे. तो मूळचा बिहारमधील बेगुसराय येथील असून सध्या मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील उर्दू शाळेजवळील दिल बर्ली परिसरात राहतो. तो रॅपिडो चालक म्हणून काम करीत होता, तर तिसऱ्याचे नाव रेहान असून ते १८ वर्षांचा आहे. हरियाणातील सोनीपत जिल्ह्यातील तो रहिवासी असल्याचे पोलिसांनी सांगितले. रेहान हा बिश्नोई गँगशी संबंधित असलेल्या अनिल पंडितच्या संपर्कात होता.

### दोषींवर कठोर कारवाई करणार -मुख्यमंत्री

**नागपूर :** अभिनेता टायगर श्रॉफच्या वाहनावर मुंबईतील जुहू परिसरात झालेल्या गोळीबार प्रकरणाची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. अंधारातून हल्ले करण्याचे प्रयत्न सहन केले जाणार नाहीत. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. ते नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

## पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अव्वल -मुख्यमंत्री

**सांगली : प्रतिनिधी**

पायाभूत सुविधाच्या गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असून शिक्षणासाठी ९० हजार कोटी रुपयांची वार्षिक तरतूद करणारे अग्रेसर राज्य असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.१९) सांगलीत केले. विधान परिषदेच्या पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार स्मिता जाधव



व कौस्तुभ गावडे यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात मुख्ममंत्री बोलत होते.

रस्ते, पूल यांसारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात राज्य शासन आघाडीवर आहे. सध्या १० लाख कोटींची पायाभूत विकासाची कामे सुरू आहेत. देशात होणाऱ्या परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात केली जात असल्याचे रिझर्व्ह बँकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. यामुळे स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीस सरकारचे नेहमीच प्रोत्साहन देण्याचे धोरण असून यापुढेही राहील, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

शिक्षण क्षेत्रावर सर्वाधिक बजेट हेसुद्धा महाराष्ट्रात आहे, असा दावा करून मुख्यमंत्री म्हणाले, ९० हजार कोटींची तरतूद शिक्षणासाठी करण्यात आली आहे. देशातील बारा-तेरा राज्याचे वार्षिक बजेटही ६० हजार कोटींचे आहे. शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांची विविध नवरात्रोत्सव मंडळांना भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवरात्रोत्सवाच्या मंगलमय पर्वानिमित्त पनवेल परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या नवरात्रोत्सवांना भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेटी देऊन देवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी सर्वांच्या सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली.

### देवीचे दर्शन घेत भाविकांशी साधला संवाद

नवरात्रोत्सवानिमित्त पनवेल परिसरातील विविध मंडळांकडून धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवांच्या माध्यमातून भक्ती, श्रद्धा आणि परंपरेचा जागर होत असून नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी विविध नवरात्रोत्सव मंडळांना भेटी देत देवीचे दर्शन घेतले तसेच मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी आणि उपस्थित भाविकांशी संवाद साधला.

या भेटीवेळी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नवरात्रोत्सव मंडळांचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत भक्तिभावाने देवीचे पूजन केले आणि शुभेच्छांची देवाणघेवाण केली.

## पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे मार्गिकेचे ९९ टक्के काम पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

उपनगरीय रेल्वेसेवेचे आधुनिकीकरण आणि प्रवासी क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) विविध प्रकल्पांमध्ये महत्त्वपूर्ण टप्पे गाठले आहेत. याअंतर्गत पनवेल-कर्जत नवीन उपनगरीय दुहेरी मार्गिकेचे काम ९९ टक्के पूर्ण झाले आहे.

पनवेल-कर्जतदरम्यान २९.६ किमी लांबीच्या नवीन दुहेरी उपनगरीय मार्गिकेचे भौतिक काम ९९ टक्के पूर्ण झाले आहे. या प्रकल्पातील सर्व पूल, रेल्वे उड्डाणपूल तसेच बोगद्यांचे खोदकाम आणि अस्तरीकरण पूर्ण झाले आहे. एकूण ६९.७० किमीपैकी ६८.७० किमी लांबीच्या मार्गावर रूळ टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.

बोगद्यांमधील खडीविरहित रुळांच्या भागात फ्लॅश बट वेल्डिंग करण्यासाठी विशेष मोबाइल वेल्डिंग यंत्रणेचा वापर करण्यात आला. उर्वरित कामे पूर्ण झाल्यानंतर या मार्गिकेची रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून तपासणी केली जाणार आहे. त्यानंतर मार्गिका प्रवासी वाहतुकीसाठी खुली करण्याच्या दिशेने पुढील प्रक्रिया होईल.

## दक्षिण रायगडात पावसाच्या सरी

**इंदापूर : प्रतिनिधी**

दक्षिण रायगडमधील महाड, माणगाव आणि इंदापूर परिसरात सोमवारी (दि.१९) ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडला. बऱ्याच दिवसांच्या प्रदीर्घ खंडानंतर अचानक आलेल्या या पावसाने स्थानिक नागरिक आणि प्रवाशांची तारांबळ उडाली.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरातून वाहणारे नैऋत्येकडील वारे आणि स्थानिक कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्यामुळे हा पाऊस सध्या पडत आहे. महाड तालुक्यातील बिरवाडी परिसर आणि विन्हेरे विभागातील काही गावांमध्ये या पावसाचा जोर सर्वाधिक राहिल्याची स्थानिक पातळीवर नोंद आहे.



**अलिबाग :** विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या पूर्वसंध्येला बाजारात झेंडूची फुले विक्रीसाठी आली होती. यंदा दुष्काळी स्थितीचा परिणाम झेंडूच्या उत्पादनावर झाल्याचे दिसून आले. (वृत्त पान २ वर..)







# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सत्काराचे कार्यक्रम टाळा -पालकमंत्री गोगावले



**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात संभाव्य दुष्काळी परिस्थितीचे सावट लक्षात घेता, सध्याच्या काळात जाहीर सत्काराचे कार्यक्रम टाळून जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य द्या, असे आवाहन रायगडचे पालकमंत्री तथा राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगावले यांनी कार्यकर्त्यांना केले. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन नागरिकांनी आतापासूनच पाणी बचतीचे नियोजन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

पोलादपूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोरगिरी येथील ३० लाख रुपये खर्चाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन पालकमंत्री गोगावले यांच्याहस्ते करण्यात आले. याच कार्यक्रमात मोरगिरी ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन करण्यात येऊन मोरगिरी गावठाण प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

मंत्री गोगावले यांनी पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत पाणी मुरवणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी नागरिकांनी आतापासूनच दक्ष राहावे, असेही स्पष्ट केले.दरम्यान, मोरगिरी शाळेच्या नूतन इमारतीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण मिळावे, तसेच गावातील मूलभूत सुविधांचा विकास व्हावा, या दृष्टीने शाळेच्या इमारतीचे लोकार्पण महत्त्वाचे ठरले.

या कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषद अर्थ, शिक्षण व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे, पंचायत समिती सभापती अविनाश शिंदे, पं.स.सदस्य अनिल दळवी, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश अहिरे, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, उपतालुकाप्रमुख सतीश शिंदे, कोंढवी विभाग महिला संघटिका गीता दळवी, सरपंच वैदेही पवार, उद्योजक रवींद्र शिंदे, मुख्याध्यापिका भाटकर, अ‍ॅड. सुयोग शिंदे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेची अतिक्रमणविरोधी कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने शहरातील अनधिकृत अतिक्रमणांविरोधात कडक कारवाई करण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत प्रभाग समिती ‘क’ आणि प्रभाग समिती ‘ड’, प्रभाग समिती ब अंतर्गत विविध ठिकाणी कारवाई करून अनधिकृत हातगाड्या व इतर साहित्य जप्त करण्यात आले.



प्रभाग समिती ‘क’ अंतर्गत सेक्टर २१ येथील व्हिस्टा कॉर्नर परिसरात फळविक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. या वेळी विक्रेत्यांचे साहित्य जप्त करण्यात आले तसेच हातगाड्यांवरही कारवाई करून त्या जप्त करण्यात आलेल्या हातगाड्या तोडण्यात आल्या तसेच कामोठेमधील सेक्टर ११ येथील अ‍ॅक्सिस बँकेसमोरील पदपथावर अतिक्रमण करून ठेवण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले व हा पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यात आला.

प्रभाग समिती ब अंतर्गत खारघर मधील सेक्टर १३ मधील रस्त्यावरील अनधिकृत फळविक्रेत्यांवर कारवाई करून पादचारी मार्ग मोकळे करण्यात आले. दरम्यान, प्रभाग समिती ‘ड’च्या अतिक्रमण पथकाच्या वतीनेही कारवाई सुरू आहे. नवीन पनवेल परिसरात रत्यावर अनधिकृतपणे विविध वस्तू विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करून सामान जप्त करण्यात आले.

# हरिहरेश्वरला मध्यरात्री थरार : हॉटेलच्या आवारात आढळली महाकाय मगर

**हरिहरेश्वर : रामप्रहर वृत्त**

प्रसिद्ध पर्यटनस्थळ आणि धार्मिक नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरिहरेश्वर गावात दिनांक १९ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास येथील एका हॉटेलच्या आवारात पूर्ण वाढ झालेली महाकाय मगर अचानक पाहायला मिळाल्यामुळे संपूर्ण गावात एकच खळबळ उडाली. रात्रीच्या निशब्द शांततेत घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, परंतु ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे आणि वनविभागाच्या तत्परतेमुळे एक मोठा अनर्थ टळला आहे.

मध्यरात्री सुमारे १ वाजता हरिहरेश्वर येथील एका हॉटेलजवळ मगर फिरत असल्याची माहिती मिळताच, क्षणाचाही विलंब न लावता हरिहरेश्वरचे जागृत रहिवाशी सचिन गुरव, पप्पू टाकले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.मगर अंधाराचा फायदा घेऊन कुठेतरी निघून जाण्याची किंवा नागरिकांवर अटॅक करण्याची शक्यता होती. त्यामुळे या धाडसी तरुणांनी कोणतीही भीती न



बाळगता अत्यंत संयमाने व सतर्कतेने त्या मगरीवर सतत लक्ष ठेवून पहारा दिला. तसेच तात्काळ याची माहिती वनविभाग आणि स्थानिक सर्पमित्रांना दिली.

माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि सर्पमित्र क्षणाचाही विलंब न करता अवघ्या काही वेळात घटनास्थळी दाखल झाले. या धाडसी रेस्क्यू ऑपरेशनमध्ये वनविभागाचे अधिकारी नागरगोजे, ननावरे, वाहनचालक केळसकर यांच्यासह प्रसिद्ध सर्पमित्र व वन्यजीव रक्षक गणेश कुडगावकर आणि सुजल खेराडे यांनी सहभाग घेतला.

या सर्व टीमने स्थानिक ग्रामस्थांच्या साथीने मध्यरात्री २ च्या सुमारास अत्यंत धोकादायक परिस्थितीत मोकळ्या जागेवर रेस्क्यू ऑपरेशन राबवले. मगरीचा आकार मोठा आणि ताकद जास्त असल्यामुळे तिला पकडणे मोठे आव्हानात्मक होते. मात्र, सर्वांनी मिळून मोठ्या प्रयत्नांची पराकाष्ठा करत, सुरक्षेचे सर्व नियम पाळून त्या पूर्ण वाढ झालेल्या व सुदृढ मगरीस कोणतीही दुखापत न पोहोचवता अत्यंत शिताफीने जेरबंद केले.

जेरबंद करण्यात आलेली मगर पूर्णपणे निरोगी आणि सुदृढ स्थितीत असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले. त्यामुळे वनविभागाच्या पथकाने आणि वन्यजीव रक्षकांनी कुठलाही धोका पत्करत तिला त्वरित तिच्या सुरक्षित नैसर्गिक अधिवासात सुखरूप मुक्त केले. मगरीला तिच्या हद्दीत पोहोचवल्यानंतर हरिहरेश्वरच्या ग्रामस्थांनी व पर्यटकांनी मोठा सुटकेचा श्वास सोडला. या संपूर्ण धाडसी आणि यशस्वी कामगिरीबद्दल हरिहरेश्वरवासीयांकडून वनविभाग, सर्पमित्र आणि स्थानिक तरुणांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# रोह्यात भल्या पहाटे दौडले तरुण आणि महिला

## नवरात्रीत सलग १२ वर्षे जपली दुर्गा दौड उपक्रमाची परंपरा

**धाटाव : प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने रोहा शहरात भल्या पहाटे तरुण आणि महिलांनी भगव्या वेशात दुर्गादौडीत सहभाग घेतला. ‘जय भवानी, जय शिवाजी’च्या जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले. एकता, शौर्य, राष्ट्रप्रेम आणि हिंदवी स्वराज्याच्या विचारांचा जागर करणारी ही दुर्गादौड श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने उत्साहात पार पडली. धारकरी राजेश काफरे यांच्या पुढाकाराने गेली १२ वर्षे हा उपक्रम अखंडपणे सुरू आहे.



पहाटे सहा वाजता तलवार आणि भगव्या ध्वजाचे पूजन करून दुर्गादौडीचा प्रारंभ करण्यात आला. दुर्गामाता मंदिरातून सुरू झालेली ही दौड रोहा शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत श्री धावीर महाराज मंदिरात पोहोचली. तेथे पूजा व दर्शन घेतल्यानंतर पुन्हा दुर्गामाता मंदिरात दौडीची सांगता करण्यात आली.

यादौडीमध्ये राजेश काफरे, भारत वाकचौरे, निलेश शिर्के, संदीप वैद्य, सुमित रीसबुड, विशाल शेलार, विशाल साळवी, नितेश जाधव, संदीप घोसाळकर, विनायक पाटील, प्रितेश पाटील, रिद्धी बोथरे, स्वरांजली शिर्के आदी धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगव्या वेशातील तरुण आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, शिस्तबद्ध संचलन आणि ‘जय भवानी, जय शिवाजी’च्या गजराने संपूर्ण शहर दुमदुमून गेले. हिंदवी स्वराज्याचे विचार, देशभक्ती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे रोहेकरांकडून कौतुक करण्यात आले.

ही केवळ एक दौड नसून हिंदवी स्वराज्याच्या विचारांची धाव आहे. रोहा-अष्टमीकर गेली बारा वर्षे या दुर्गादौडीला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत. तरुणांमध्ये देशभक्ती आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा जागृत करण्याचा हा आमचा छोटासा प्रयत्न असल्याचे दुर्गादौडचे प्रमुख धारकरी राजेश काफरे यांनी सांगीतले.

# वावंढळ येथील इस्कॉन साईटवर चॉपरने मारहाण

## तरुण गंभीर जखमी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक वावंढळ गावच्या हद्दीतील इस्कॉन साईटवर जुन्या वादातून मारहाण झाल्याची घटना १८ ऑक्टोबर रोजी दुपारी घडली. या घटनेत एका व्यक्तीच्या भावावर चॉपरने वार करून गंभीर दुखापत केल्याचा आरोप असून, फिर्यादीसह त्यांच्या भावालाही हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वावंढळ येथील सर्व्हे क्रमांक ६५/१, ६५/२, ६६/१, ६६/२ तसेच इतर सर्व्हे क्रमांकांतील एकूण सुमारे ७.५ एकर क्षेत्राची मिळकत फिर्यादी यांच्या वडिलोपार्जित मालकीची होती. सदर मिळकत सुमारे ४० वर्षांपूर्वी विक्री करण्यात आली होती. या ठिकाणी इस्कॉन ट्रस्टच्या माध्यमातून मंदिर व शाळा बांधण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले आहे.संबंधित जागेवर गवत साफ करण्याचे काम सुरू असताना १८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी आणि आरोपी क्रमांक २ यांच्यात वाद झाला होता. त्यानंतर दुपारी ४.१५ वाजण्याच्या सुमारास आरोपी क्रमांक २ याने फिर्यादी यांना फोन करून इस्कॉन साईटवर बोलावले.

फोन आल्यानंतर फिर्यादी हे आपल्या भावासह इस्कॉन साईटवर गेले असता, आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून त्यांच्यावर हल्ला केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. आरोपी क्रमांक ३ आणि आरोपी क्रमांक ४ राजेश गावडे यांनी फिर्यादी यांच्या भावाला मागून पकडून ठेवल्याचा, तर आरोपी क्रमांक १ याने त्याच्या दोन्ही हातांवर तसेच पोटावर चॉपरने वार करून गंभीर जखमी केल्याचा आरोप आहे. याशिवाय इतर आरोपींनी फिर्यादी आणि त्यांच्या भावाला हाताबुयांनी मारहाण करून दुखापत केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे करीत आहेत.

# कर्जतकरांनी केली जीवनवाहिनीची पूजा

**कर्जत : प्रतिनिधी**

दररोज इच्छित स्थळी वेळेवर व न चुकता पोहोचविणाऱ्या प्रवाशांची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकल गाड्यांची पूजा गेल्या अनेक वर्षांपासून कर्जतकर दसऱ्याच्या निमित्ताने करतात. ही पूजा दसऱ्याच्या आदल्या दिवशी करतात. हल्लीच्या संगणकीय युगातही या पूजेचा खंड पडला नव्हता मात्र कोरोना संकटात दोन वर्षे जीवनवाहिनीची पूजा करता आली नाही. जीवन वाहिनीच्या पूजेची परंपरा अजूनही सुरु आहे.



काही प्रवासी निवृत्त झाले तरीही ते जीवनवाहिनीच्या पूजेसाठी आवर्जून उपस्थित असतात. कर्जतहून सुटणाऱ्या बहुतांश लोकल गाड्यांची पूजा त्या -.त्या गाडीने जाणाऱ्या प्रवाशांनी अगदी मनोभावे करून आपल्या जीवनवाहिनी बद्दल आदर व्यक्त केला. पहाटे चार नंतर सुटणाऱ्या लोकल गाड्यांमधून चाकरमानी व व्यावसायिक दररोज प्रवास करतात. मुंबईला जाण्यासाठी सर्वात वेळेवर, सर्वात स्वस्त व सुरक्षित प्रवास म्हणजे रेल्वेचा त्यातच लोकल गाड्यांनी हजारो प्रवाशी जा ये करीत असतात. याची उतराई म्हणून दसऱ्याच्या आदल्या दिवशी किंवा दसऱ्याच्या दिवशी हे प्रवासी आपल्या जीवनवाहिनीची न चुकता मनोभावे पूजा करतात.

या सर्व लोकल गाड्यांच्या प्रवाश्यांपैकी सकाळी ७ वाजून ५२ मिनिटांनी कर्जत हून सुटणाऱ्या लोकलचे प्रवासी फारच हौसी त्यांनी आपापले डबे सजविलेच शिवाय लोकलच्या पहिल्या डब्याचा पुढचा भागही सजविला होता.

# आर्थिक समावेशन संतृप्तता अभियानाचा गुरुवारी शुभारंभ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वित्तीय सेवा विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार संपूर्ण देशात राबविण्यात येणाऱ्या आर्थिक समावेशन संतृप्तता अभियानाची सुरुवात २१ ऑक्टोबर पासून होणार आहे. या अभियानाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचा शुभारंभ कार्यक्रम गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता पेण येथील मराठा समाज भवन, गणपती वाडी, पेणखोपोली बायपास रोड, रिलायन्स कम्युनिकेशन कार्यालयामागे येथे आयोजित करण्यात आला आहे. हे अभियान २१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

या अभियानाच्या माध्यमातून पात्र नागरिकांना विविध आर्थिक समावेशन योजना आणि बँकिंग सेवांचा लाभ मिळवून देण्यावर भर देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजना यांसारख्या योजनांबाबत जनजागृती करणे आणि पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करणे ही अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

अभियानांतर्गत निष्क्रिय बँक खाती पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही, आधार जोडणी, प्रलंबित पुनःकेवायसी (Re-KYC), सी-केवायसी (C-KYC) नोंदणी आणि खात्यांमध्ये नामनिर्देशन अद्ययावत करणे यावर विशेष भर देण्यात येणार आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड (KCC) योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

याशिवाय, ‘आपली पुंजी, आपला अधिकार’ (तुमचे पैसे, तुमचा हक्क) हा उपक्रमही अभियानाचा एक महत्त्वाचा भाग आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आर्थिक जागरूकता निर्माण करणे यावर भर देण्यात येणार आहे.

# नवरात्रोत्सवात बाजारात झेंडू १०० रुपये प्रतिकिलो



**अलिबाग : प्रतिनिधी**

दुष्काळी स्थितीचा परिणाम झेंडूच्या उत्पादनावर झाला असून, नवरात्रोत्सवाच्या काळात फुलांची आवक जास्त झाल्याने दरात घट झाली आहे. दरवर्षी १०० ते १२० रुपये किलोने मिळणारा झेंडू यंदा १०० रुपये प्रतिकिलोपेक्षा कमीदराने विकला जात आहे.

नवरात्रोत्सवात देवीच्या पूजेसाठी तसेच धार्मिक कार्यक्रमांसाठी झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असते. ही मागणी लक्षात घेऊन अनेक शेतकरी दरवर्षी झेंडूची लागवड करतात. मात्र, यंदा ऐन हंगामात पावसाने पाठ फिरवल्याने झेंडूच्या शेतीला फटका बसला आहे. पाण्याअभावी झेंडूची रोपे सुकून गेली असून, काही ठिकाणी रोपे कोलमडल्याने उत्पादनात घट झाली आहे. मंगळवारी दसरा असल्याने बाजारात झेंडूची मोठी आवक झाली आहे.पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे झेंडूच्या लागवडीपासून ते उत्पादनापर्यंत शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. जवळपास २० ते ३० टक्के रोपे कोलमडल्याने फुलांचे उत्पादन कमी झाले आहे .पण आवक जास्त झाल्याने गतवर्षीच्या तुलनेत यंदा झेंडूचे दर कमी झाले आहेत.

पान १ वरुन

# रायगडचा वार्षिक आराखडा मंजूर

अनुसूचित जाती उपाययोजनेत कृषी व संलग्न सेवा एक कोटी ५० लाख, विद्युत विकास दोन कोटी ३४ लाख ७५ हजार, उद्योग व खाण सात लाख ३० हजार, वाहतूक व दळणवळण नऊ कोटी २६ लाख, सामाजिक व सामूहिक सेवा १३ कोटी ५५ लाख ९५ हजार अशी तरतूद करण्यात आली आहे.

२०२५-२६ या वर्षासाठी ५५४ कोटी तीन लाख कोटी रुपयांचा जिल्हा आराखडा होता. हा सर्व निधी वितरीत करण्यात आला. तथापि, सप्टेंबर २०२६अखेर ८७.४५ टक्के इतका खर्च झाला आहे. हा निधी संपूर्णपणे खर्च करण्याबाबत जिल्हा परिषद यंत्रणांना सूचना देण्यात आल्या.

नियोजन समितीची सभा आहे हे माहीत असतानादेखील अनेक अधिकारी या सभेला गैरहजर राहिले, त्याबद्दल सर्वांनी नाराजी व्यक्त केली. या सभेला गैरहजर राहिलेल्या अधिकाऱ्यांकडून खुलासे मागवा, असे आदेश यावेळी पालकमंत्र्यांनी दिले.

# तळोजातील दूध प्रकल्पांवर एफडीएचा बडगा

## तीन परवाने निलंबित

**पनवेल : वार्ताहर**

दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ होत असल्याच्या संशयावरून अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) तळोजातील तीन प्रकल्पांवर कारवाई केली. उत्पादन प्रक्रियेत स्वच्छता आणि दूध साठवणुकीचे नियम पाळले जात नसल्याचे प्राथमिक तपासात आढळल्याने तिन्ही प्रकल्पांचे परवाने निलंबित करण्यात आले. कारवाईत १,४९४ लिटर दूध नष्ट करण्यात आले, तर दही जप्त करण्यात आले. याप्रकरणी सहा जणांविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.



(एआय निर्मित छायाचित्र)

तळोजा औद्योगिक वसाहतीतील तोंडरे गावाजवळील बालाजी औद्योगिक पार्कमधील मातेश्वरी फूड्स, सावरीया मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट आणि रॉयल फूड्स या आस्थापनांची एफडीएच्या पथकाने तपासणी केली. सहाय्यक आयुक्त अजित मैत्रे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

कारवाईदरम्यान मातेश्वरी फूड्समधील ५९८ लिटर आणि सावरीया मिल्क अँड मिल्क प्रॉडक्टमधील ८९६ लिटर दूध नष्ट करण्यात आले. रॉयल फूड्समधील दही जप्त करण्यात आले. दुधाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, अहवालानंतर पुढील कारवाई केली जाणार असल्याचे सहाय्यक आयुक्त अजित मैत्रे यांनी सांगितले.

या प्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भेसळयुक्त दूध व दुग्धजन्य पदार्थ तयार करणे, साठवणे आणि विक्री केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. भारतीय न्याय संहिता तसेच अन्न सुरक्षा व मानदे कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून, तळोजा पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.दुधाचे नमुने तपासणीचे अहवाल अद्याप प्राप्त झालेले नसल्याने भेसळीबाबतचा अंतिम निष्कर्ष अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे.

# करंजाडे येथील जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

## ११ जणांवर गुन्हे

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे येथील सेक्टर ५ मध्ये सुरू असलेल्या जुगारावर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी जुगार चालविणाऱ्या एका व्यक्तीसह पैसे लावून जुगार खेळणाऱ्या १० जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी कारवाईदरम्यान रोख रकमेसह विविध कंपन्यांचे मोबाईल फोन असा एकूण २ लाख ७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



(एआयनिर्मित छायाचित्र)

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार १९ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास करंजाडे सेक्टर ५ येथील एक व्यक्ती स्वतःच्या फायद्यासाठी जुगार चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी संबंधित ठिकाणी कारवाई केली. यावेळी अन्य १० जण दोन गटांत बावन्न पत्त्यांवर पैशांची बाजी लावून जुगार खेळत असल्याचे आढळून आले. या कारवाईत एकूण ११ जणांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## सेंट विल्फ्रेड्स कॉलेज ऑफ लॉमध्ये अभिमुखता कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

सेंट विल्फ्रेड्स कॉलेज ऑफ लॉ, पनवेल येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी अभिमुखता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची शैक्षणिक कार्यपद्धती, परीक्षा पद्धती आणि कायद्याच्या क्षेत्रातील करिअरच्या संधींची माहिती देणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि गणेश पूजनाने झाली. प्राचार्या डॉ. अवनी मिस्त्री यांनी स्वागतपर भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पनवेल न्यायालयातील अधिवक्ता व कायदेशीर सल्लागार अॅड. भूषण म्हात्रे, रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेडचे राष्ट्रीय प्रमुख व दक्षता अधिकारी बन्सी लाल भारद्वाज, महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचे वरिष्ठ पत्रकार व मा.विशेष कार्यकारी अधिकारी संजय कदम आणि कायदेशीर सल्लागार व सामाजिक कार्यकर्ते अॅड. मनोहर सचदेव उपस्थित होते.

## नवरात्रोत्सवात पं. उमेश चौधरी, ज्ञानेश्वरी गाडगे यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध

**पनवेल : प्रतिनिधी**

पळस्पे येथे गवंडी व चोरघे परिवाराच्यावतीने कुलदैवत उत्सवानिमित्त नवरात्रोत्सवाच्या पाचव्या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या सांगीतिक मैफिलीत पंडित उमेश चौधरी आणि कुमारी ज्ञानेश्वरी गाडगे यांच्या सुरेल गायनाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले. शास्त्रीय संगीत, अभंग आणि भक्तिरचनांच्या सुरेल आविष्कारातून रंगलेल्या या मैफिलीने




उपस्थितांना भक्तिरसाबरोबरच संगीत आनंदाची अविस्मरणीय अनुभूती दिली.

मैफिलीची सुरुवात पंडित उमेश चौधरी यांनी राग अडाणा मधील 'माता कालिका' या बंदिशीने केली. त्यानंतर कुमारी ज्ञानेश्वरी गाडगे यांनी राग बसंत बहारमधील 'केतकी गुलाब' ही बंदिश सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. पुढे पंडित चौधरी यांनी 'सुखाचे सुख' हा अभंग, तर ज्ञानेश्वरी गाडगे यांनी 'हरी म्हणा, गोविंद म्हणा' हा भक्तिरसपूर्ण अभंग सादर केला. 'नाम तुझे बरवा' या अभंगातून पंडित चौधरी यांनी भक्तिभावाची अनुभूती दिली. ज्ञानेश्वरी गाडगे यांनी 'बारम्मा लक्ष्मी' हा कन्नड अभंग आणि त्यानंतर गौळण सादर करून मैफिलीत वेगळी रंगत आणली.

कार्यक्रमाच्या अखेरीस पंडित उमेश चौधरी आणि कुमारी ज्ञानेश्वरी गाडगे यांनी एकत्रितपणे 'भवानी दयानी' आणि 'हेची दान देगा देवा' या भैरवीतील रचना सादर केल्या.













खारघर : नवरात्रोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री कच्छ कडवा पाटीदार समाज आयोजित नवरात्रोत्सव तसेच भाजपप्रणित मधु पाटील प्रतिष्ठान आणि प्रवीण पाटील वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने आयोजित भव्य खारघरची आई-नमो गरबा महोत्सवाला विशेष भेट दिली. तेथे त्यांनी आदिशक्तीची आरती करून सर्व गरबाप्रेमी, नागरिक आणि भाविकांना नवरात्रोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, उपमहापौर प्रमिला पाटील, प्रभाग समिती सभापती मधु पाटील, नगरसेवक प्रवीण पाटील, अमर पाटील, नरेश ठाकूर, रवींद्र भगत, नगरसेविका परेशा पटेल, मनाली ठाकूर, दमयंती भोईर, सरस्वती काथारा, ब्रिजेश पटेल, अजित अडसुळे, शुभ पाटील, अभिषेक पटवर्धन, अमर ठाकूर, अशोक मोटे आदी उपस्थित होते.



















पनवेल : नवरात्रोत्सवाच्या मंगलमय पर्वानिमित्त पनवेल परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या नवरात्रोत्सवांना भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेटी देऊन दुर्गामातेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी देवीचे मनोभावे पूजन करून सर्वांच्या सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली.

# रायगडच्या उर्वरित १४ तालुक्यांतही दुष्काळ जाहीर करावा -पालकमंत्री

**अलिबाग– प्रतिनिधी**

रायगड मधील १४ तालुक्यामध्ये दुष्काळ जाहीर करा असा ठराव सोमवारी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सर्वानुमते घेण्यात आला. हे तालुके दुष्काळी तालुके म्हणून जाहीर व्हावे राज्यमंत्रीमंडळाच्या बैठकीत यासाठी पाठपुरावा केला जाईल अशी माहिती रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी दिली.




ते जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलत होते. राज्यातील इतर विभागाप्रमाणे यंदा कोकणात कमी पाऊस झाला. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात सरासरीपेक्षा ५० टक्के पाऊस पडला. ऑक्टोबर मध्येही पावसाने हजेरी लावलेली नाही. या परिस्थितीमुळे भात शेतीवर परिणाम झाला आहे. अनेक तालुक्यात किड रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे पिक परिस्थिती चिंताजनक आहे. पिक दाणे भरण्याच्या स्थितीत असल्याने पाऊस गायब झाल्याने पिकावर गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील उर्वरीत १४ तालुक्यांचाही दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश केला जावा अशी मागणी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सर्वच लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली. त्यास मंजूरी देण्यात आली. तसा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. हा ठराव राज्यसरकारकडे पाठविण्यात येणार असल्याचेही गोगावले यांनी सांगीतले. राज्यमंत्रीमंडळाच्या बैठकीतही जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे आणि मी यासंदर्भात पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

जिल्हा विकास निधीतील कामांमध्येही दुष्काळ निवारणाच्या कामांना प्राधान्य दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगीतले. वेळ पडल्यास बांधकामांसाठी उपलब्ध असलेला निधीही पाणी टंचाई निवारणासाठी खर्च केला जाईल. पिण्याच्या पाण्याची कमतरता भासणार नाही. पाण्याअभावी उद्योगधंदे बंद पडणार नाहीत तसेच जनावरांनाही पाणी उपलब्ध राहील यासाठी दक्षता घेण्याचे निर्देश यंत्रणांना देण्यात आले असल्याचेही गोगावले यांनी सांगीतले

जिल्ह्यात निधी अभावी जलजीवन मिशन योजनेतील अनेक कामे रखडली आहेत. केंद्र सरकारकडून या योजनांसाठी निधी येणेआवश्यक आहे. यासाठी खासदार श्रीरंग बारणे आणि खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून केंद्रसरकारकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त; दोन जणांना अटक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत फार्म हाऊस आणि घरफोडीच्या घटनांमधून इन्व्हर्टर, बॅटरी, टीव्ही, वॉशिंग मशीन, बोअरिंग पंप तसेच लोखंडी पाइप चोरणाऱ्या दोन संशयितांना कर्जत पोलिसांनी अटक केली आहे. सहा वेगवेगळ्या गुन्ह्यांची उकल करत पोलिसांनी सुमारे दोन लाख पन्नास हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. कर्जत पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने ही कारवाई केली.

सप्टेंबर २०२६ मध्ये दाखल झालेल्या कर्जत पोलीस ठाण्यातील गुन्हा रजिस्टर क्रमांक ३५५, ३५६, ३५७, ३५८, ३६७ आणि ३६८/२०२६ या सहा गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांना यश आले. गोपनीय माहितीच्या आधारे सुगवे येथील तुषार चवळे आणि राहुल पेमारे या दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी संगनमताने कशेळे परिसरातील विविध फार्म हाऊस, घरांमध्ये तसेच बांधकामासाठी आणून ठेवलेल्या साहित्याची चोरी केल्याचा पोलिसांचा आरोप आहे. या चोऱ्यांमध्ये बोअरिंगची मोटर, वॉशिंग मशीन, ३२ इंची टीव्ही, चार बॅटरी, चार इन्व्हर्टर, मोटारसायकल आणि १८ जीआय लोखंडी पाइप यांचा समावेश आहे.

कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण कक्षाच्या सहाय्यक महिला पोलीस निरीक्षक मनीषा लटपटे यांच्या पथकाने ही कामगिरी केली. हवालदार लालासाहेब तोरवे, पोलीस कॉन्स्टेबल राहुल जाधव तसेच गुन्हे प्रकटीकरण कक्षातील केशव नागरगोजे, समीर भोईर, स्वप्निल येरुनकर, सतीश पाटील, योगेश गर्जे ऋतिक गोऱ्हाणे, आणि घुले यांनी तपासात सहभाग घेतला.



# भाजप महिला मोर्चातर्फे महाभोंडला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील गंगामाता सभागृहामध्ये भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या वतीने विधानपरिषद भाजप गटनेते व कॅबिनेट दर्जाचे स्वयंनिर्माण अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाभोंडलाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी देवीच्या वेगवेगळ्या रूपांची फॅन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेला महिलांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. स्पर्धा लहान व मोठा गट अशी दोन गटांत घेण्यात आली. एकूण तीस महिला स्पर्धकांनी भाग घेतला. मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थितीत राहून भोंडल्याचा आनंद घेतला. प्रणाली रुपेश वनारसे या परीक्षण करण्यासाठी उपस्थित राहिल्या. अत्यंत खेळीमेळी अणि उत्साहात कार्यक्रम पार पडला. अल्पोपाहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

उज्वला राजेश शेठ यांनी महाभोंडल्याचे निवेदन केले. आभार प्रदर्शन सोनिया सचिन शेठ यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमासाठी महिला मोर्चाच्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतल्याचे दिसून येत होते.

# उत्तेखोल आश्रमशाळेत ‘आमच्या दुर्गा’माता पूजन सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र संचलित कै. सौ. विजया गोपाळ गांधी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, उत्तेखोल येथे नवरात्रोत्सवानिमित्त ‘आमच्या दुर्गा’ या संकल्पनेतून माता पूजनाचा भावपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये मातृप्रेम, कृतज्ञता आणि संस्कारांची रुजवणूक करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात ४७ महिला पालक सहभागी झाल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या आईचे पाद्यपूजन, औक्षण करून आशीर्वाद घेतले. या भावनिक सोहळ्याने उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.



या आश्रमशाळेला २६ वर्षे पूर्ण झाली असून वनवासी समाजातील सुमारे ४५० विद्यार्थी येथे निवासी राहून शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत, यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. दरवर्षी नवरात्रोत्सवात कन्यापूजन केले जाते. यंदा प्रथमच विद्यार्थ्यांच्या महिला पालकांचा सन्मान करण्यासाठी माता पूजनाचा उपक्रम राबविण्यात आला.

वनवासी समाजातील महिला पहाटे पाच वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत कष्टाची कामे करतात. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी अथक परिश्रम घेतानाच आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्या त्यांना शिक्षणासाठी आश्रमशाळेत पाठवतात. मुलांना शिक्षणाच्या माध्यमातून चांगले भविष्य मिळावे, यासाठी मन कठोर करून त्यांच्यापासून दूर राहणाऱ्या या महिला खऱ्या अर्थाने ‘दुर्गा’ आहेत, अशी भावना या उपक्रमामागे व्यक्त करण्यात आली.

आईबद्दल प्रत्येकाच्या मनात अपार प्रेम असते; मात्र ते नेहमी शब्दांतून व्यक्त होत नाही. हे प्रेम कृतीतून व्यक्त करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळावी, यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या आईचे पाय धुतले, पूजन केले, औक्षण करून नमस्कार केला. वसतिगृह अधीक्षिका मीनाक्षी कांबळे आणि खारघर येथून आलेल्या वनवासी कल्याण आश्रमाच्या महिला कार्यकर्त्यांनी महिला पालकांची ओटी भरून त्यांचे स्वागत केले.

आपल्या मुलांनी आपले पाय धुवावेत, पूजन करावे, हा अनुभव अनेक मातांसाठी पहिलाच होता. आपल्या मुलांकडून मिळालेला हा सन्मान पाहून काही माता भावुक झाल्या, काहींनी मुलांच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवला, तर काहींच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. आपल्या मुलांनी व्यक्त केलेले प्रेम आणि आदर पाहून महिला पालक भारावून गेल्या.

या कार्यक्रमासाठी नवी मुंबईतील खारघर येथून वनवासी कल्याण आश्रमाचे कार्यकर्ते आणि नवीन सहकारी असे एकूण १५ जण उपस्थित होते. त्यांनी शाळा व वसतिगृह परिसराची पाहणी केली आणि माता पूजन सोहळ्यातही सहभाग घेतला.

या भेटीदरम्यान पाहुण्यांनी शाळेसाठी १६ नवीन पंखे, विद्यार्थ्यांसाठी साबण, तेल व दंतमंजन असलेले ४५० संच, तसेच अकरावीच्या विद्यार्थिनींसाठी पंजाबी ड्रेस भेट दिले. उपस्थितांपैकी १३ कार्यकर्ते हे १९८८ च्या पदवीधर वर्गातील वर्गमित्र असून ते दरवर्षी एकत्र येऊन विविध शाळांना मदत करतात. यंदा त्यांनी उत्तेखोल आश्रमशाळेसाठी मदतीचा हात पुढे केला.

# दसऱ्याच्या मुहूर्तावर तळा बाजारात झेंडूची फुले, नव्याचे तोरणांना अधिक मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात मोठ्या पारंपारिक व भक्तीभावाने दसरा सण साजरा केला जात असून दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर आदल्या दिवसापासून झेंडूची फुले व नव्याचे तोरण मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी दाखल झाली असून नागरिक आदल्या दिवसापासूनच खरेदी करत असल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे.झेंडूच्या व शेवंतीच्या फुलांचे दर १२० ते २०० पर्यंत आहेत.तसेच नव्याच्या तोरणांचे दर एका तोरणात पाच झुपके नव्याचे बांधलेले तोरण ५० रूपये तर एक झुपका १० रूपये अशी किंमत नव्याच्या तोरणाची आहे.नव्याच्या एका झुपक्यामधे एक नाचणीचे बोंड,वरीची एक लोंबी,भाताची एक लोंबी,झेंडूचेफुल,आंब्याचे एक पान व वनस्पतीचे एक फुल असा एक आकर्षक झुपका होतो.



नविन येणाऱ्या धान्याचा एक प्रकारे सन्मान देण्यात येते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही .हे नव्याचे

नव्याचे तोरण परंपरेप्रमाणे तोरण मुख्य दरवाजाला बांधणे म्हणजे आपण धान्यलक्ष्मीला आपल्या घरात येण्याचे आमंत्रण देत आहोत .यामुळे घरात सुख समृध्दी आणि बरकत येते अशी श्रध्दा आहे.शेतकऱ्यांची ही परंपरा आजही कायम दिसत आहे.या नव्याचे तोरण आदल्या दिवसापासून खरेदीसाठी गर्दी होताना दिसत आहे.

नव्याचे तोरण विक्रीसाठी आदिवासी समाजातील महिलांनी चांगल्या पध्दतीचे तोरण नव्याच्या धान्याच्या लोंबी व घराच्या शेजारी असणाऱ्या परसबागेतील फुलांचा वापर करून आकर्षक बनविलेले तोरण ग्राहकांच्या पसंतीस येऊन मोठ्या प्रमाणात विक्री झाली असून आर्थिक उत्पन्न मिळाले असल्याचे आदिवासी समाज म्हणत आहेत.यामुळे या समाजाला हा एक आधार मिळाला आहे.आपट्याच्या झाडाच्या फांद्या बाजारात विक्रीसाठी आल्या आहेत.याफांद्याही खरेदीकडे नागरिकांचा कल पाहवयास मिळत आहे.


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड

**जाहीर निविदा सूचना**

पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महिलांसाठी **“महिला उद्योजिका महोत्सव– २०२६”** आयोजित करणेकामी दि. २०/१०/२६ ते दि. २६/१०/२६ या कालावधीत इच्छूक संस्था/पुरवठा धारक यांचे कडून याबाबींसंदर्भात दर पत्रके मागविणेत येत आहेत.

पनवेल महानगरपालिका सन २०२६ – २०२७ या कालावधीकरिता पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महिलांसाठी **“महिला उद्योजिका महोत्सव– २०२६’’** आयोजित करणेबाबत दरपत्रके दिनांक २०/१०/२०२६ ते दिनांक : २६ /१०/२०२६ पर्यंत दुपारी १२.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागात सादर करावीत. तरी वरील उपक्रमांतील सविस्तर माहिती व कामाच्या अटी / शर्ती महिला व बालकल्याण विभागात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करण्यात येतील, तसेच इच्छूकांनी सदरची दरपत्रके दि.२६/१०/२६ रोजी दुपारी ३.३० वाजे पर्यंत महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाकडे सादर करावीत. प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी दुपारी ३.४५ वाजता मा. उपायुक्त (महिला व बालकल्याण) यांचे दालनात उघडण्यात येतील. या कामाच्या बाबत अधिक माहितीसाठी महिला व बालकल्याण विभागाशी संपर्क साधावा.

**या कामी अटी व शर्ती खालील प्रमाणे–**

१. भावपत्रकांत नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे करांसह समाविष्ठ असावेत.
२. नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे कर व वाहतूक खर्चासह समाविष्ठ असतील. तसेच महापालिका सुचित करेल त्या ठिकाणी कार्यक्रम राबविण्याची सर्वस्व जबाबदारी संबंधित संस्था/पुरवठाधारक यांची राहिल.
३. सदरचे दरपत्रकांसोबत पॅन कार्ड, जी. एस. टी. प्रमाणपत्र, दुकान, संस्था नोंदणीपत्रक/आधारउद्योग जोडणे आवश्यक आहे.
४. कोणतेही दरपत्रक स्विकारणे / नाकारणेचा अधिकार पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

दिनांक : १९/१०/२०२६
जा.क्र.:पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.३५०/३७१/२०२६

**सही/–**
**(डॉ. रुपाली माने)**
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका



**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई यांचे कार्यालय**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, ५ वा मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई– ४००६१४.
E-mail Id – asistantregistrar३५३@gmail.com

जा.क्र.उनि/ससं/सिडको/क. १५४–ब(२९)/जाहीर नोटीस / २३७७/२०२६

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ ब – २९(१) अंतर्गत दाखल दाव्यावरील सुनावणीची जाहीर नोटीस.**

(चेअरमन/सेक्रेटरी,
'जय गणेशजी को–ऑप हौसिंग सोसायटी लि.
भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६, कामोठे,
नवी मुंबई ४१०२०९. .................. **अर्जदार**

**विरुध्द**

श्री.सत्ती एन. रेड्डी
शॉप नं. ५६, जय गणेशजी को–ऑप हौसिंग
सोसायटी लि. भुखंड क्र. ३४, सेक्टर ३६,
कामोठे, नवी मुंबई ४१०२०९ .................. **जाब देणार**

**तुम्हास नोटीस देणेत येते की,**

१) अर्जदार संस्थेनी जाबदेणार **श्री.सत्ती एन. रेड्डी** (शॉप नं. ५६), यांचे विरुध्द थकीत देखभाल शुल्क व इतर शुल्क अशी एकुण रक्कम **रु.१,१४,३२९/–** भरण्यात आली नसल्यामुळे कलम १५४ व २९ अन्वये वसूली दावा दि.०२/०७/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. या कार्यालयामार्फत सदर दिनांक १२/०८/२०२५, १०/१०/२०२५ व २९/०९/२०२६, सुनावणीस जाबदेणार श्री.सत्ती एन. रेड्डी हे सतत गैरहजर राहीले असल्याने **सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता** निश्चित करण्यात येत आहे.
२) **अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.**
३. जाब देणार यांनी त्यांच्या बचवासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.
४. आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

दिनांक :– १९/१०/२०२६

**सही/–**
**(शंकर पाटील)**
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई



एम.व्ही.टी.व्ही.

**पाहिजेत : दैनंदिन ठेव प्रतिनिधी**
**एम.व्ही.टी.व्ही. सहकारी पतपेढी लि., शाखा : पनवेल**

४७ वर्षांची सहकाराची परंपरा आणि ६०,०००+ सभासदांचा विश्वास. ३५० कोटींहून अधिक व्यवसाय आणि ६ शाखांचे विस्तृत जाळे.

पनवेल व परिसरासाठी दैनिक ठेव संकलन करणाऱ्या प्रामाणिक आणि मेहनती उमेदवारांची आवश्यकता.

**पात्रता :** किमान १० वी किंवा १२ वी उत्तीर्ण
**वयोमर्यादा :** वय वर्षे ६० पर्यंत.
**अनुभव :** पतपेढी किंवा बँकिंग क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांना व स्थानिकांना प्राधान्य.
**फायदे :** आकर्षक कमिशन व प्रगतीची संधी.

इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा व आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष भेट द्यावी.

**पत्ता :** शॉप नं – ३, नील आंगण अपार्टमेंट, प्लॉट नं २९, सेक्टर – १९, न्यू पनवेल, ४१० २०६.
**मोबाईल :** ८६५७४७३५७३/९७६८८८०३१३
**Email ID :** umesh@mvtvccs.com
**वेळ :** सकाळी ९:३० ते ५:३०



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मऔविम

प्रस्तावासाठी विनंती (RFP) सूचना क्रमांक GEM/२०२६/B/८१७३५०५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | Selecting and on-boarding Consultant for Direct Tax Compliance |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २३.१०.२०२६ ते दिनांक २०.११.२०२६ पर्यंत https://gem.gov.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

# सुगंधी शहरासाठी महापौर सुजाता पाटील यांनी स्वीकारले स्वच्छतेचे पालकत्व



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

वनमंत्री गणेश नाईक यांच्या संकल्पनेतील नवी मुंबईला 'सुगंधी शहर' बनविण्याच्या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद मिळत असून, या अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'अंगण दत्तक योजने'त महापौर सुजाता सूरज पाटील यांनी सहभाग घेत स्वच्छतेचे पालकत्व स्वीकारले आहे. नेरूळ विभागातील सेक्टर १४, कुकशेत येथील आपल्या निवासस्थानासमोरील परिसराच्या दैनंदिन स्वच्छतेची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आहे.

महापौर सुजाता पाटील यांनी सोमवारी (१९ ऑक्टोबर) विहित नमुन्यातील अर्ज ऑनलाइन पोर्टलवर नोंदवून या योजनेत सहभाग नोंदविला. वाशी गावातून मार्च २०२६ मध्ये या योजनेचा शुभारंभ करण्यात आला होता. त्यावेळी महापौर सुजाता पाटील उपस्थित होत्या.

नवी मुंबई शहर स्वच्छ आणि सुगंधी ठेवण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. निवासी, व्यापारी, छोटे-मोठे व्यावसायिक, फेरीवाले, विविध संस्था-संघटना, शासकीय व निमशासकीय संस्थांसह त्यांच्या कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमात सहभाग घेतला आहे. आतापर्यंत एक लाखांहून अधिक नागरिकांनी स्वेच्छेने स्वच्छतेचे पालकत्व स्वीकारल्याची माहिती देण्यात आली आहे.

शहरातील प्रत्येक नागरिकाला महापालिकेच्या माध्यमातून विविध सेवा, सुविधा आणि लाभ मिळतात. त्याचप्रमाणे शहर स्वच्छ ठेवण्याची सामाजिक जबाबदारीही नागरिकांनी स्वीकारावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. सार्वजनिक जागांची स्वच्छता राखणे हे केवळ महापालिकेचे काम नसून, नागरिकांनीही कर्तव्यभावनेतून त्यात योगदान देणे आवश्यक आहे. नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये यांच्यात संतुलन राखून लोकसहभागातून नवी मुंबईला स्वच्छतेत देशात अव्वल स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे.

## वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते ५० फुटी रावणाचे आज होणार दहन

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते ऐरोलीत प्रथमच ५० फुटी रावण दहनाचा कार्यक्रम दसऱ्याच्या दिवशी आयोजित करण्यात आला आहे. त्याचबरोबर सोमवार दिनांक १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ ते १० या वेळेस रामलीला कार्यक्रम सुद्धा आयोजित केला आहे.

रावण हा अहंकारी व अत्याचारी विचारांचा होता त्याच्या अंताने रामराज्य आले. असे अहंकारी व अत्याचारी विचार नष्ट करण्यासाठी मंगळवारी दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी सात वाजता दिवागाव खाडी मैदान डी मार्ट रोड शिवस्मारकासमोर ऐरोली सेक्टर १० येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

## निर्मला फाउंडेशनकडून गुणवंत विद्यार्थी, शिक्षकांचा सन्मान

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांना शैक्षणिक व करिअर मार्गदर्शनाच्या उद्देशाने निर्मला फाउंडेशन गुळसुंदे यांच्या वतीने रसायनी परिसरातील गुळसुंदे हायस्कूल, आपटे विद्यालय, सावळे विद्यालय, चावणे विद्यालय, वाशिवली विद्यालय, जनता विद्यालय मराठी माध्यम व इंग्रजी माध्यमिक विद्यालय, रिलायन्स फाउंडेशन स्कूल मराठी माध्यम, प्रिआ स्कूल, मोहोपाडा या नऊ शाळांतील एसएससी परीक्षा २०२६मधील प्रथम तीन क्रमांक प्राप्त २९ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे वैज्ञानिक प्रज्ञेश म्हात्रे, चीफ इंजिनिअर टायटन स्पेस इंडस्ट्रीज यू.एस.ए. नासा लुसी ॲस्ट्रॉइड मिशनचे ॲम्बेसीडर, रायगड जिल्हा परिषद सदस्य अनन्या गाताडे, खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णाशेठ पारंगे, वावेघर जिल्हा परिषद भाजप अध्यक्ष अविनाश गाताडे, लक्ष्मण म्हात्रे, सेवानिवृत्त शिक्षक ए.आर. पाटील, मनोज पवार, जितेंद्र गाताडे, सचिन ठोंबरे, प्रकाश म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

निर्मला फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांना कौतुकाची शाब्बासकी दिल्याने विद्यार्थी अधिक जोमाने प्रगती करून आपल्या पुढील आयुष्यात यशस्वी होतील हा विश्वास व्यक्त केला. तसेच गुणवंत शिक्षक सन्मान हा त्या शिक्षकांच्या उल्लेखनीय कार्याचा सन्मान आहे त्यामुळे त्यांनी हे कार्य असेच चालू ठेवावे यासाठी शिक्षकांना शुभेच्छा. प्रज्ञेश म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध शाखांची माहिती देत असताना आपण स्वतःचा बिजनेस, स्वतःचा स्टार्टअप सुरु करून देखील करून इतरांना नोकरी देण्याची संधी उपलब्ध करू शकता याविषयी मार्गदर्शन केले तसेच भारतीय स्पेस क्षेत्रात भविष्यात येणाऱ्या विविध संधीची माहिती सांगितली.

या प्रसंगी निवास थळे, रा.जि.प. प्राथमिक शाळा वावेघर, प्रवीण पाटील, सार्वजनिक विद्यामंदिर साई, श्रुती कोरडे, रिलायन्स फाउंडेशन स्कूल मराठी माध्यम लोधीवली, विलास पाटील, अनंत पांडुरंग भोईर विद्यालय दापोली पारगाव या सर्व शिक्षकांचा निर्मला फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे निवेदन रुपाली पाटील, सृष्टी पाटील यांनी केले. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशांत पाटील, विकास पाटील, रुबेन पाटील, रूपम पाटील, कल्पना पाटील, प्रियंका पाटील, वृषाली ठोंबरे यांनी सहकार्य केले.

## जेएनपीएच्या कामगार विश्वस्त पदाची १४ डिसेंबर रोजी निवडणूक



**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए कामगार विश्वस्तांच्या निवडणुक येत्या १४ डिसेंबर महिन्यात होणार असल्याचे जाहीर केले आहे.दोन कामगार विश्वस्तांच्या या निवडणुकीत प्रथमच कामगारांबरोबर आता अधिकारी वर्गाच्या ऑफिसर्स असोसिएशनलाही निवडणूक लढविण्याला मान्यता दिली आहे.यामुळे विश्वस्त पदांची निवडणूक पंचरंगी आणि रंगतदार होणार आहे.

जेएनपीए प्राधिकरण स्थापनेनंतर ऑक्टोंबर २०२२ मध्ये पहिली कामगार विश्वस्तांची निवडणुक पार पडली होती.त्यानंतर ३१ मार्च २०२६ रोजी दोन कामगार विश्वस्तांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर निवडणूक जाहीर होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र केंद्रीय कामगार आयुक्तांकडून जेएनपीएच्या दोन कामगार विश्वस्त पदाची निवडणुकीसाठी मंजुरी दिली नव्हती.यामुळे निवडणूक पाचसहा महिन्यांपासून रखडली होती.त्यानंतर जेएनपीए दोन कामगार विश्वस्तांची निवडणूक ९० दिवसात घेण्याचे आदेश केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाचे सेक्रेटरी अनिता बिस्त यांनी मुंबईच्या मुख्य कामगार आयुक्तांना दिले आहेत.

.मात्र निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच जेएनपीए कामगार विश्वस्तांच्या निवडणुकीत अधिकाऱ्यांनाही मतदानाचा हक्क मिळावा अशी मागणी जेएनपीए ऑफिसर्स असोसिएशनने केली होती.ऑफिसर्स असोसिएशनच्या या मागणीवर निर्णय घेण्यासाठी शनिवारी १६ ऑक्टोबर रोजी मुंबई कामगार आयुक्त संजय डाबी यांनी नवीन प्राधिकरण ॲक्टमध्ये ऑफिसर्स असोसिएशनला निवडणूक लढविण्याची तरतूद असल्याचे कामगार मंत्रालयाचे म्हणणे आहे.त्यामुळे कामगार संघटनांच्या विरोधानंतरही जेएनपीए कामगार विश्वस्तांच्या निवडणुकीत कामगारांबरोबर आता ऑफिसर्स असोसिएशनला विश्वस्तांच्या निवडणुकीत निवडणूक लढविण्यासाठी मान्यता दिली.

## सतर्कता जागरूकता सप्ताहांतर्गत ग्रामसभा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सतर्कता जागरूकता सप्ताहांतर्गतबँक ऑफ इंडिया, नवी मुंबई विभागीय कार्यालयाच्या वतीने केंद्रीय दक्षता आयोग (CVC) यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सतर्कता जागरूकता सप्ताहाच्या अनुषंगाने ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक १६ ऑक्टोबर रोजी १० ग्रामीण व निमशहरी शाखांमध्ये विविध ठिकाणी ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले. ह्या सभांमध्ये ३५० नागरिकांनी सहभाग नोंदवला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्राहक तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये बँकिंग व्यवहारांतील दक्षता, सायबर फसवणूक प्रतिबंध आणि सुरक्षित डिजिटल बँकिंगबाबत जनजागृती निर्माण करणे हा होता. नवी मुंबई विभागा अंतर्गत अंबाडी, नेरे, उलवे, उरण, आसनगाव,



शहापूर, वाकडपाडा, न्हावा शेवा, निळजे आणि गव्हाण या शाखांनी संबंधित ग्रामपंचायत, सार्वजनिक सभागृह, शाळा तसेच इतर सामुदायिक ठिकाणी ग्रामसभांचे आयोजन करून ग्राहक व नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधला.

ग्रामसभांमध्ये प्रामुख्याने खालील महत्त्वाच्या बाबींविषयी जनजागृती करण्यात आली: OTP कोणत्याही व्यक्तीसोबत शेअर करू नये.'डिजिटल अरेस्ट'सारख्या सायबर फसवणुकीच्या प्रकारां पासून सावध राहावे. ऑनलाइन कर्ज फसवणूक बाबत दक्ष राहावे आणि अनोळखी व्यक्ती/संस्थांना वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये. मनी म्यूल खाती मध्ये अनोळखी व्यक्तींच्या सांगण्यावरून पैसे स्वीकारणे किंवा हस्तांतरित करणे टाळावे.बनावट QR कोड घोटाळे पासून सावध राहावे व पैसे प्राप्त करण्यासाठी QR कोड स्कॅन करण्याची गरज नसते, याबाबत माहिती देण्यात आली. बनावट मोबाईल ॲप्स, वेबसाइट्स व फसव्या लिंक्स वर क्लिक किंवा डाउनलोड न करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सायबर फसवणूक झाल्यास तातडीने राष्ट्रीय सायबर क्राईम हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधून तक्रार नोंदविण्याबाबत माहिती देण्यात आली.

या जनजागृती कार्यक्रमांमध्ये संबंधित शाखा व्यवस्थापक व शाखेतील कर्मचारी, तसेच सतर्कता अधिकारी के चैतन्य यांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमांचे आयोजन नवी मुंबई विभागाचे , विभागीय व्यवस्थापक बिरेंद्र कुमार गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उप विभागीय व्यवस्थापक अंतर्यामी सारंगी यांच्या सहकार्याने करण्यात आले.

## फुंडे विद्यालयात गरब्याचा जल्लोष; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे शाखेत नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून गरबा उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला देवीचे पूजन विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, लेखनिक नवनीत ठाकूर व उपस्थित सर्व सेवकवृंदांच्या हस्ते करण्यात आले.

रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख, तालबद्ध संगीत व आकर्षक नृत्याविष्कारामुळे विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा, लोककलेची ओळख झाली. विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना, आत्मविश्वास व सांस्कृतिक जाणीव निर्माण झाली. विद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. गरब्याच्या तालावर रंगलेला नृत्याविष्कार विद्यार्थ्यांसाठी आनंददायी ठरला. उत्साह, एकता व भारतीय संस्कृतीचा सुंदर संगम घडवणाऱ्या कार्यक्रमामुळे विद्यालयात नवरात्रोत्सवाचे मंगलमय वातावरण अनुभवायला मिळाले.

गरबा कार्यक्रमास कला शिक्षक एन. के. पाटील, ए. आर. म्हात्रे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील यांनी केले.



**पनवेल : प्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी लेखक विजय पवार, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ आदी उपस्थित होते.**

## नेरूळमध्ये पारंपरिक भोंडला

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

लोकमान्य टिळक जनकल्याण उत्सव समिती आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सव, नेरूळ पश्चिम येथे रविवार, १८ ऑक्टोबर २०२६ रोजी एन. आर. बी. एज्युकेशनल ट्रस्ट संचालित शिक्षण प्रसारक विद्यालय (माध्यमिक विभाग), नेरूळ, नवी मुंबई यांच्या वतीने महिलांचा पारंपरिक भोंडला कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

भोंडला हा महाराष्ट्रातील विशेषतः मुली आणि महिलांमध्ये लोकप्रिय असलेला पारंपरिक लोकउत्सव आहे. देवीच्या मंडपासमोरील मोकळ्या जागेत पाटावर हत्तीची मूर्ती ठेवून तिच्याभोवती उपस्थित विद्यार्थिनी आणि महिलांनी पारंपरिक भोंडल्याच्या गीतांवर सुरेख फेर धरत नृत्य केले. पारंपरिक गीतांचा गजर, आणि उत्स्फूर्त सहभाग यांमुळे कार्यक्रमाला सांस्कृतिक रंगत आली.या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना मराठी संस्कृती आणि परंपरेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. शिक्षणासोबतच सांस्कृतिक मूल्यांची जोपासना, सामाजिक एकोपा आणि परंपरांविषयी आदर निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

**नवरंग | मोरपिसी**



फुंडे हायस्कूल, उरण





**दुर्गामाता दौड (माळ नववी)**

**पनवेल : अखंड हिंदू समाज शिवछत्रपती, धर्मवीर शंभू छत्रपती यांच्या ध्येयधोरणांवर मार्गक्रमण करीत आहे. नवरात्रोत्सवात आई तुळजाभवानीच्या चरणी लीन होण्यातच जीवनाचे सार्थक आहे. शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानकडून सोमवारी पनवेल तालुक्यातील नानोशी, डेरवली, चिखले आदी ठिकाणी दुर्गा दौड उत्साहात पार पडली.**



पनवेल महापालिका स्टाफ



गव्हाण कोपर विद्यालय शिक्षिका वृंद



जासई हायस्कूल, उरण- शिक्षिका वृंद

# रायगडात आरोग्याचा जागर

## सेवा संकल्प अभियानांतर्गत रुग्णांची तपासणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत आरोग्याचा जागर साजरा करण्यात आला. या अभियानांतर्गत जिल्ह्यात एकूण एक लाख एक हजार ८९९ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान सेवा संकल्प अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत एकूण १,४२८ वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पुरुष ५०,६३१, महिला २९,१८१ आणि बालके २२,०८७ अशा लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली आहे. हृदयविकार, औषधोपचार, शस्त्रक्रिया, बालरोग, स्त्रीरोग, अस्थिविकार, नेत्रविकार आणि इतर आजारांसाठी विविध वैद्यकीय विभागांमार्फत सेवा देण्यात आल्या.



५,५९६ रुग्णांची ईसीजी तपासणी करण्यात आली, तर ३९३ रुग्णांना अँजिओग्राफी व इतर तपासण्यांबाबत सांगण्यात करण्यात आले. एकूण २,५६९ रुग्णांची रक्ततपासणी करण्यात आली. १५ रक्तदान शिबिरांमध्ये १०२१ रक्तदात्यांनी सहभाग घेतला, तर ६२ नागरिकांनी अवयवदानासाठी लेखी संमती दिली.

उच्च जोखमीच्या गर्भवतींना विशेष उपचार देण्यात आले. तिसऱ्या तिमाहीत हिमोग्लोबिन ९.९पेक्षा कमी असलेल्या २१३ गर्भवतींपैकी २०४ जणींना उपचार देण्यात आले. दुसऱ्या तिमाहीत हिमोग्लोबिन ९.४पेक्षा कमी असलेल्या १५८ गर्भवतींना तसेच हिमोग्लोबिन सातपेक्षा कमी असलेल्या ५२ गर्भवतींना उपचार देण्यात आले. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत चार हृदयशस्त्रक्रिया आणि इतर ३४ शस्त्रक्रियांची नोंद करण्यात आली.

जन आरोग्य समितीच्या माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर ११ आणि उपकेंद्र स्तरावर ६२ बैठका घेण्यात आल्या. या माध्यमातून ग्रामस्तरावरील आरोग्यविषयक नियोजन आणि जनजागृतीला चालना देण्यात आली.

रक्तक्षय प्रतिबंधाच्या दृष्टीने एकूण ३३,१२४ हिमोग्लोबिन तपासण्या करण्यात आल्या. यामध्ये बालके, किशोरवयीन मुले-मुली, प्रजननक्षम वयोगटातील महिला, गर्भवती आणि प्रसूतीनंतरच्या मातांचा समावेश आहे. सिकलसेल तपासणी मोहिमेत ८,८०२ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १३२ नवीन क्षयरुग्णांची नोंद करण्यात आली, तर ४८ ग्रामपंचायतींची टीबीमुक्त ग्रामपंचायत म्हणून नोंद अहवालात आहे. कुष्ठरोग शोधमोहीमेत ६१ नवीन रुग्ण आढळल्याची नोंद करण्यात आली.

### आयुष शिबिरे आणि ग्रामस्तरीय जनजागृती

आयुष विभागामार्फत ज्येष्ठ नागरिकांसाठी १४ शिबिरांत ५०२ लाभार्थ्यांनी, तर आरोग्य शिबिरांत ८९२, योग शिबिरांत २११, महिला आरोग्य शिबिरांत २६७ आणि रक्तक्षय व पोषणविषयक शिबिरांत ९२ लाभार्थ्यांनी सहभाग घेतल्याची नोंद आहे. याशिवाय दोन वृक्षारोपण उपक्रमांमध्ये १७ झाडे लावण्यात आली.

### जन्म-मृत्यू प्रमाणपत्र सेवेलाही गती

२४ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या १६ दिवसांच्या कालावधीत जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांशी संबंधित २,२८५ प्रमाणपत्रांची नोंद करण्यात आली. त्यापैकी १,५३७ प्रमाणपत्रे मंजूर झाली, तर ७४८ प्रमाणपत्रे नामंजूर झाली.

# माथेरानमध्ये बिबट्याचा वावर

## स्थानिकांसह पर्यटकांमध्ये भीती; उपाययोजनेची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये बिबट्याच्या वाढत्या वावरामुळ स्थानिक नागरिक आणि पर्यटक यांच्यामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दस्तुरी नाका येथील पार्किंग, अमन लॉज स्टेशन परिसर आणि वन ट्री हिल पॉईंट परिसरात स्थानिक नागरिकांना बिबट्या दिसल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.





माथेरान हे दाट जंगल आणि वन्य जीवांचे नैसर्गिक अधिवास असलेले पर्यटनस्थळ असल्याने येथे अन्य प्राण्यांसोबत अधूनमधून बिबट्याचे दर्शन होत असते, मात्र सध्या काही दिवसांत दोन ते तीन वेळा बिबट्या स्थानिक नागरिकांना दिसला आहे. बिबट्याचा वावर वाढत असल्याने येथील पोलीस प्रशासन आणि वन विभाग यांनी स्थानिकांना सतर्कतेचा इशारा दिला असून रात्रीच्या वेळी प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे.

दस्तुरी नाका टॅक्सी स्टँडहून माथेरान शहरात रात्रीच्या वेळी येणारे नागरिक तथा पर्यटकांनी ई-रिक्षाचा वापर करावा तसेच येथे कोणीही अंधारातून पायी चालत प्रवास करू नये असे आवाहन करण्यात आले आहे. दस्तुरी येथील पार्किंग परिसर, अमन लॉज स्टेशनजवळील परिसर आणि वन ट्री हिल पॉईंट परिसर; त्याचबरोबर येथील हनिमून पॉईंट परिसर या भागात बिबट्याचा वावर असल्याने सर्वांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

माथेरानच्या वेगवेगळ्या परिसरात बिबट्या दिसत असल्याने हा नक्की एकच बिबट्या आहे की अधिक आहेत असा प्रश्नदेखील उपस्थित होत आहे.यासाठी वन विभागाने गस्त वाढवून बिबट्याला त्वरित जेरबंद करावे, जेणेकरून भीती दूर होईल, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि पर्यटक करीत आहेत.

# श्रीवर्धन शहरात सततची वाहतूक कोंडी

## नागरिक त्रस्त; तोडगा काढण्याची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरातील मुख्य मार्गांवर होणाऱ्या सततच्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. बाजारपेठ, वाणीआळी व टिळक मार्गावर नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. विशेष म्हणजे शनिवार व रविवारी पर्यटकांची संख्या खूप मोठ्या प्रमाणावर असते. अशा वेळेला वाहतूक कोंडी होत असल्यामुळे इच्छितस्थळी पोहचण्यासाठी उशीर लागतो.



श्रीवर्धनमध्ये फिरायला येणारे पर्यटकसुद्धा शहराचे सौंदर्य न्याहाळण्यासाठी अत्यंत मंद गतीने वाहने चालवत, रस्ता विचारण्यासाठी मधोमध गाडी उभी करत असल्याने वाहतूक कोंडीत वाढ होत असते. येथील रस्त्यांचे रुंदीकरण व्हावे यासाठी अनेक वेळा प्रयत्न करण्यात आले. अनेक वेळा रस्त्यांची मोजणी होऊन ज्या प्रमाणात रुंदीकरण करायचे आहे त्यासाठी खुणादेखील केल्या गेल्या, परंतु रुंदीकरण्याच्या समस्येला स्थानिक नागरिकांचा विरोध असल्याने परिस्थिती अवघड आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याकडे जाण्यासाठी पर्यायी मार्गाचा अवलंब करण्यात यावा अशी मागणी पुढे येत होती, परंतु शहरात पर्यायी मार्गाचा अवलंब झाल्यास बाजारपेठेतील व्यापारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशी चर्चादेखील ऐकायला मिळते. शहरातील वाहतुकीची सगळ्यात गंभीर समस्या म्हणजे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वेड्यावाकड्या उभ्या करण्यात येणाऱ्या दुचाकी, अनधिकृत रिक्षा स्टॅन्ड व शहरातील वाहतूक नियमनासाठी जिल्हा वाहतूक शाखेचा असलेला एकच वाहतूक पोलीस ही आहे.

प्रत्येक भाजी दुकानदार प्लास्टिकचे चार चार क्रेट पुढे लावून त्यावर भाजी विकण्यासाठी ठेवतात. पर्यायाने चार फुटांचा रस्ता कमी होतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला चार चार फुटाचे अतिक्रमण झाल्यावर किती रस्ता शिल्लक राहणार? तर मच्छी विकणाऱ्या महिलांसाठी मच्छी मार्केट उपलब्ध असतानासुद्धा रस्त्याच्या कडेला उघड्यावर बसत असल्याने नागरिकांना बाजारपेठेत खरेदी करायला गेल्यावर दुचाकी उभी करण्यासाठीदेखील जागा शिल्लक नसते. वाहतूक कोंडीच्या या गंभीर प्रश्नावर श्रीवर्धन नगर परिषद, लोकप्रतिनिधी आणि पोलीस प्रशासन यांनी कठोर भूमिका घेऊन समस्या सोडवावी, अशी मागणी जनतेमधून केली जात आहे.

# पोलादपुरात बंदुकीसह जिवंत काडतुसे जप्त

## तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर शहरातील दांडिया गरबा संपल्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास एसटी बसस्थानकासमोरील हॉटेलसमोर रस्त्यावर एका पीकअप जीपमधील तीन व्यक्तींची हालचाल संशयास्पद वाटल्याने स्थानिक सामाजिक कार्यकर्तीने रात्रीच्या गस्तीवरील पोलिसांना ही बाब सांगितली. पोलिसांनी जीपची झाडाझडती घेऊन वाहनासह सिंगल बोअर काडतूसची लाकडी बट असलेली बंदूक आणि १० जिवंत छरा काडतुसे हस्तगत करण्यात आली.

यावेळी बंदूक जवळ बाळगण्याचा अगर बंदूक वापरण्याचा परवाना नसताना चालकाकडे हा मुद्देमाल दिसून आला. चालकासोबत प्रथमेश उद्धव निकम (वय ३०) आणि अजित अशोक राजपुरे (वय ३६, दोघेही रा. सातारा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# मानकिवली कामगार मृत्यूप्रकरणी रोड रोलर चालकावर गुन्हा दाखल



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील आंजरून मानकिवली येथील कस्तुरी लॉजिस्टिक गोडाऊनचे काम सुरू असताना घडलेल्या दुर्घटनेत एका कामगाराचा मृत्यू आणि १५ कामगार जखमी झाले होते. या प्रकरणी रोड रोलरचालक अनिल कुमार जोधसिंग (वय ३० रा. पंजाब) विरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१३ ऑक्टोबर रोजी गोडाऊन शेडच्या लोखंडी पिलरला रोड रोलरचालक अनिल कुमार यांनी खबरदारी न घेतल्याने धडक बसली होती. या धडकेत शेड कोसळून सुभाष सिंग या कामगाराचा मृत्यू झाला, तर अन्य १५ जण गंभीर जखमी झाले होते. पोलिसांनी या घटनेचा तपास करून पाच दिवसानंतर अनिल कुमार जोधसिंग या रोड रोलर चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

# पँथर सेनेकडून पालकमंत्री गोगावलेंचा सत्कार

**श्रीवर्धन : बातमीदार**

अखिल भारतीय पँथर सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कोकण विभागीय पदाधिकाऱ्यांनी रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांची भेट घेऊन ते पालकमंत्री झाल्याबद्दल त्यांचा सत्कार केला. यावेळी जिल्ह्यातील विविध समस्या, तालुका स्तरावर अपूर्ण असलेल्या कामांबद्दल चर्चा करून समस्या सोडवण्याबाबत मंत्री गोगावले यांना विनंती करण्यात आली.



यावेळी पँथर सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश भालेराव, जिल्हा युवक अध्यक्ष राम गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष अनिल कडू, महिला कोकण विभाग अध्यक्ष अमृता वाघमारे, जिल्हा अध्यक्ष योजना लोखंडे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोहोपाड्यात बजरंग दलाचा कन्यापूजन सोहळा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून मोहोपाडा येथील श्री दत्त मंदिराच्या सभामंडपात आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या वतीने आयोजित कन्यापूजन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात झाला. यावेळी दुर्गादेवीचे स्वरूप मानल्या जाणाऱ्या जवळपास २४० कन्यांचे त्यांच्या माता-पित्यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले.



या उपक्रमातून भारतीय संस्कृतीतील कन्यापूजनाचे महत्त्व अधोरेखित करत नारीशक्तीप्रती आदर व्यक्त करण्यात आला. पूजन करण्यात आलेल्या सर्व कन्यांना बजरंग दलाच्या वतीने भेटवस्तू देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बिना रेगे यांच्या सुमधुर आवाजातील भक्तिमय गायनाने झाली. त्यानंतर दुर्गाशक्तींच्या वतीने लव्ह जिहाद या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महिला व मुलींची सुरक्षितता, सामाजिक जागरूकता आणि संभाव्य धोक्यांबाबत सजग राहण्याचे आवाहन उपस्थितांना करण्यात आले.

कन्यापूजनाच्या माध्यमातून कन्येमध्ये देवीचे स्वरूप पाहण्याची भारतीय परंपरा जपण्याचा आणि मुलींबद्दल आदर, प्रेम व सन्मानाची भावना दृढ करण्याचा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला. माता-पित्यांनी आपल्या कन्यांचे विधिवत पूजन करून त्यांच्याप्रती असलेले प्रेम आणि आदर व्यक्त केला.

रसायनी-पाताळगंगा परिसरात बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी दरवर्षी अशाच प्रकारे भव्य कन्यापूजन सोहळ्याचे आयोजन करावे, अशी अपेक्षा उपस्थित कन्यांच्या माता-पित्यांनी व्यक्त केली.

# फातिमा मातेची तीर्थयात्रा उत्साहात

## हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत मधील ख्रिश्चन धर्मियांचे प्रार्थना मंदिर (चर्च) गेल्या काही दशकांपासून फातिमा माऊलीच्या नावाने प्रसिद्ध आहे. प्रत्येक वर्षी १३ ऑक्टोबर किंवा त्यानंतर येणाऱ्या रविवारी या मातेची तीर्थयात्रा असते. यंदा फातिमा मातेची ९१वी तीर्थयात्रा उत्साहात झाली. देश-विदेशांतून आलेल्या भाविकांनी मातेचे दर्शन घेतले तसेच अन्य धर्मियांनीदेखील उपस्थिती दर्शवून दर्शन घेतले.



कर्जत रेल्वेस्थानकानजीक असलेल्या चर्चच्या परिसरात अक्षरशः जत्रेचे स्वरूप आले होते. सकाळी फातिमा मातेच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. धार्मिक उपासना व प्रार्थना, आर्चबिशप जॉन रॉड्रीग्ज यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर फातिमा मातेच्या पुतळ्याची बँड पथकाच्या तालावर मिरवणूक निघाली. या वेळी ख्रिश्चन धर्मियांबरोबरच अन्य धर्मीय भाविकांनीही जागोजागी मातेच्या पुतळ्यावर फुलांचा वर्षाव केला.

आर्चबिशप जॉन रॉड्रीग्ज यांनी भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शन केले. त्यांच्यासोबत पवित्र वेदीवर प्रमुख धर्मगरू फादर ज्यो डिमेलो, फादर डेनिस घोन्सलवीस, फादर मॅथ्यू, फादर बोनाविंचूर आदींनी सहभाग घेऊन भाविकांना आशीर्वाद दिले. अ‍ॅड. अँथोनी डिमेलो आभार प्रदर्शन केले.

यावेळी विल्सन पानपाटील, सिल्व्हर फ्रान्सिस, अ‍ॅड. सनी डिमेलो, साधवा पानपाटील, जेनी फ्रान्सिस, नेल्सन फ्रान्सिस, संगीता भोईर, सॅविओ फ्रान्सिस, सिमरन फ्रान्सिस, रॉकी फ्रान्सिस, शाव्हियो फ्रान्सिस आदींसह देश-विदेशातून असंख्य ख्रिश्चन बांधव भगिनी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदगाव हायस्कूलमध्ये संगीत शिक्षणाचे धडे

**मुरूड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथे शालेय विद्यार्थ्यांना आठवड्यातील प्रत्येक शनिवारी संगीताचे धडे देण्यात येणार आहेत. या शाळेत शिक्षक असणारे सागर राऊत यांनी ही जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली आहे.

उद्घाटन समारंभास शाळेचे अध्यक्ष फिरोज घलटे, संचालक अस्लम हलडे, गणेश गाणार, मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी राहील घलटे, शिक्षकेतर प्रतिनिधी संतोष बुल्लू, वरिष्ठ लिपीक मंगेश नांदगावकर तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# नवरात्रोत्सव मंडळांतर्फे विविध कार्यक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरासह तालुक्यात सर्वत्र नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. तालुक्यात ६३ मंडळांतर्फे देवीची स्थापना करण्यात आली असून विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत.



नवरात्रोत्सवाला भारतात अनन्यसाधारण महत्त्व आहे. देवीची प्रतिष्ठापना अलीकडे ग्रामीण भागातदेखील तितक्याच उत्साहाने व आनंदाने केली जात. दांडिया रासमध्ये तरुणाईचा उत्साह दिसून येतो.

पूर्वी शहरात गुजर-मारवाडी समाज नवरात्रोत्सवात दांडिया रास, गरबा नृत्य पेश करीत असत, परंतु अलीकडे अगदी वनवासी वाड्या व पाड्यांवरदेखील दांडियाचा आनंद लुटताना वनवासी बांधव दिसतात.

लक्ष्मीखार मंडळांतर्फे शक्ती-तुऱ्याचे रंगतदार व अस्सल ग्रामीण ढंगाचे नाच आयोजित करून ग्रामीण लोक कलेला प्रोत्साहन मिळताना दिसते. राजपुरी येथील शाहीर घागरी यांचे नाच मंडळ विविध ठिकाणी बहारदार कार्यक्रम करीत आहे.

महिला वर्गासाठी हा उत्सव पर्वणीच म्हणता येईल. मुरुड येथील गणेश आळीत बल्लाळ विनायक महिला मंडळातर्फे भोंडल्याचा कार्यक्रम रंगतदार ठरतो. याला हादगा असेही संबोधतात. एकंदर नवरात्रोत्सव जोरदार उत्साहात साजरा होत आहे.

# चिन्मय सुतारची ४०० धावांची खेळी

## रणजी ट्रॉफीत अशी कामगिरी करणारा दुसराच फलंदाज



**दिमापूर : वृत्तसंस्था**

रणजी ट्रॉफी स्पर्धेत मिझोरमच्या चिन्मय सुतारने सोमवारी (दि.१९) नागालँड क्रिकेट स्टेडियममध्ये नागालँडविरुद्ध खेळताना ४०० धावांचा टप्पा गाठला. यासह देशांतर्गत क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारा तो दुसरा फलंदाज ठरला. यापूर्वी १९४८मध्ये महाराष्ट्राकडून खेळताना भाऊसाहेब निंबाळकर यांनी पुण्यात नाबाद ४४३ धावांची खेळी केली होती.

चिन्मयने आपल्या या ऐतिहासिक खेळीत ४६ चौकार आणि सात षटकार लगावले. शेवटचा फलंदाज लालरेम्पुइया मैदानात आला, तेव्हा चिन्मय २३१ धावांवर खेळत होता. त्यानंतर त्याने धावांचा धडाका कायम ठेवला. अखेर मिझोरमने ९ बाद ५८१ धावांवर डाव घोषित केला. त्यावेळी चिन्मय ५१७ चेंडूंत ४०० धावा करून नाबाद होता.

चिन्मय सुतारने क्रिकेटच्या इतिहासात ४०० धावांचा टप्पा गाठणाऱ्या एकूण १० फलंदाजांच्या विशेष यादीत स्थान मिळवले आहे. या यादीत ब्रायन लारा, डॉन ब्रॅडमन यांसारख्या दिग्गज फलंदाजांचाही समावेश आहे.

चिन्मय सुतारने आपल्या पदार्पणाच्या सामन्यात ९९ धावा केल्या होत्या. त्यावेळी त्याला धावबाद होऊन माघारी परतावे लागले होते. मिझोरमकडून खेळण्यापूर्वी या डावखुऱ्या फलंदाजाने मुंबईच्या प्रतिष्ठित देशांतर्गत संघाकडून विजय हजारे ट्रॉफीमध्ये सहभाग घेतला होता. त्यानंतर आता रणजी ट्रॉफीत मिझोरामकडून खेळताना चारशे धावांची विक्रमी खेळी केली आहे.

## वेस्ट इंडिज 'वर्ल्ड चॅम्पियन'

**शारजाह : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिज चॅम्पियन्स संघाने वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स २०२६चे विजेतेपद पटकावलं आहे. शारजाह येथे झालेल्या अंतिम सामन्यात ख्रिस गेलच्या नेतृत्वाखालील वेस्ट इंडिज चॅम्पियन्सने इंग्लंड चॅम्पियन्सचा नऊ गडी राखून पराभव केला.

प्रथम फलंदाजी करताना इंग्लंड चॅम्पियन्सने २० षटकांत सात गडी गमावून १५९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात वेस्ट इंडिज चॅम्पियन्सने १७व्या षटकातच केवळ एक गडी गमावून १६० धावांचं लक्ष्य गाठले. चार षटकांत २१ धावा देऊन तीन बळी घेणारा ड्वेन ब्रावो या अंतिम सामन्याचा हिरो ठरला आणि त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

# जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विद्यालयाने पनवेल महानगरपालिका जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत यश संपादन केले आहे.

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अंतर्गत आणि पनवेल महानगरपालिका आयोजित जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा लोकनेते दि.बा. पाटील स्कूल येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. १७ वर्षांखालील मुलींमध्ये प्राची लोणशीकर हिने तृतीय क्रमांक, मुलांमध्ये वेद घनवट याने द्वितीय, आर्यन पवार (तिघेही इयत्ता १०वी) याने पाचवा क्रमांक प्राप्त केला. १४ वर्षांखालील मुलांमध्ये श्लोक जांभळेने चतुर्थ आणि विराज साबळेने (दोघेही इयत्ता ८वी) सहावा क्रमांक मिळवला. या विद्यार्थ्यांची मुंबई विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास म्हात्रे, पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर, मार्गदर्शक शिक्षक विलास यशवंतराव, ज्योती बडवी तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## रिद्धिमा म्हात्रेचा बॅडमिंटन स्पर्धेत 'सुवर्ण स्मॅश'

### राज्यस्तरावर निवड



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या गव्हाण-कोपर येथील एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ विज्ञान विद्यालयात इयत्ता नववीत शिकणाऱ्या रिद्धिमा कर्मवीर म्हात्रे हिने विभागस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पालघर येथील विराज इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित विभागस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात रिद्धिमाने प्रथम क्रमांक पटकावला.

या सुवर्ण यशामुळे रिद्धिमाची राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. रिद्धिमाने आपल्या मेहनतीच्या जोरावर आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणातून हे यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, विद्यालयाच्या प्राचार्य सायली वडवलकर, पर्यवेक्षक अरुण जोशी व प्रणिता गोळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# बास्केटबॉल स्पर्धेत 'केबीपी'ला रौप्यपदक



**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) महाविद्यालयाच्या पुरुष बास्केटबॉल संघाने मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत रौप्यपदक पटकावले आहे.

मुंबई विद्यापीठाच्या वतीने १५ व १६ ऑक्टोबर रोजी एनकेटीटी महाविद्यालय, ठाणे येथे ही आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत केबीपी महाविद्यालयाच्या पुरुष संघाने उत्कृष्ट सांघिक खेळ, जिद्द आणि क्रीडाकौशल्याच्या जोरावर उपविजेतेपद प्राप्त केले.

'केबीपी'च्या या संघात अभिषेक कचरे, प्रजोल मोरे, साहिल मोरे, साहिल सकपाळ, सार्थक जाधव, युवराज कव्हर, श्रेयश गायकवाड, आशिष सावंत, ओम वायदंडे व रोहित राठोड यांचा समावेश होता. त्यांना जिमखाना प्रमुख डॉ. श्रीकांत जक्केवाड क्रीडाप्रमुख प्रा. भास्कर हनवटे, प्रा. महादेव खाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक, उपप्राचार्य डॉ. राजश्री घोरपडे आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

## भारतीय महिलांचा झिम्बाब्वेवर सलग दुसरा विजय

**रायपूर : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने झिम्बाब्वेविरुद्ध सुरू असलेल्या टी-२० मालिकेत २-०ने विजयी आघाडी घेतली आहे. दुसऱ्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेला अवघ्या १०२ धावा करता आल्या. त्यानंतर भारताने दमदार फलंदाजी करीत नऊ गडी राखून विजय मिळवला.

कर्णधार स्मृती मानधना आणि शफाली वर्माने पहिल्या चेंडूपासून झिम्बाब्वेच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. दोन्ही फलंदाजांनी ९६ धावांची भागीदारी करून भारतीय संघाला विजय मिळवून दिला. यादरम्यान शफालीने अर्धशतक झळकावले, तर स्मृतीने ४७ धावांची खेळी केली.



## जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत काकळघर शाळेची बाजी

**रेवदंडा :** पनवेल येथील शेडुंग परिसरात पार पडलेल्या रायगड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत मुरूड तालुक्यातील काकळघर येथील पीएनपी माध्यमिक शाळेच्या मुलींनी उल्लेखनीय कामगिरी करत १४ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल शाळा समितीचे चेअरमन संतोष कांबळी, सीताराम ठाकूर, ॲड. सुरेश नांदगावकर, मुख्याध्यापक मनोज सुर्वे यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थिनींच्या कामगिरीचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## झंकार नवरात्रोत्सव





















**पनवेल : मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या प्रांगणात सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित झंकार नवरात्रोत्सवाच्या आठव्या दिवशी प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील घरत, मयुरेश नेतकर, संजय जैन, रोहित जगताप, राज ठाकूर आदींची उपस्थिती लाभली. दांडिया स्पर्धेतील बालकलाकार व उत्कृष्ट गरबा सादर करणाऱ्या गुणवंत स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.**




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com